# मेट्रो ३मध्ये कामगार भरती

मुंबई : मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने (एमएमआरसीएल) ५,६३७ जागांसाठी जाहिरात प्रसिद्ध केली आहे. कंत्राटदारांमार्फत राज्यातील कुशल, अकुशल कामगारांसाठी गवंडी, सुतारकाम, फिटर (स्टील आणि बार फिक्सिंग), वेल्डर, इतर (इलेक्ट्रिशियन वायरमन) आणि अकुशल कामगार यांसह एकूण नऊ विभागांत या जागा उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

एमएमआरसीएलकडे मुंबई मेट्रो ३ म्हणजेच मुंबईतील पहिल्या भुयारी मेट्रो मार्गाची जबाबदारी आहे. या प्रकल्पासाठी काम करणाऱ्या एकूण ७ कंत्राटदारांना श्रमिकांचा तुटवडा जाणवत आहे. ही बाबत लक्षात घेत संबंधित यंत्रणेने ही जाहिरात प्रसिद्ध केली आहे. जाहिरातीनुसार, गवंडी (२७७), सुतारकाम (८०४), फिटर : स्टील आणि बार फिक्सिंग (२०३८), वेल्डर (१६२), इतर : इलेक्ट्रिशियन वायरमन (५९) आणि अकुशल कामगार (१८७७), रिगर (३१२), पाईप फिटर (५८), क्रेन ऑपरेटर (४९) अशा रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. या प्रकल्पात काम करू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी एमएमआरसीएलच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर केलेल्या जाहिरातीतील कंत्राटदारांच्या प्रतिनिधींना संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.